# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ५९–२०१०/६०–२०१०/ दिनांक :

नव महाराष्ट्र सूत गिरणी, साजणी, (केस क्र. ५९)
इचलकरंजी, जि. कोल्हापूर — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
कोल्हापूर
२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, इचलकरंजी, जि. कोल्हापूर — विरूध्द पक्षकार
३) उप कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
ग्रामीण उप विभागीय कार्यालय, इचलकरंजी, जि. कोल्हापूर

मे. घाटगे पाटील इंडस्ट्रीज, (केस क्र.६०)
उचगांव, कोल्हापूर — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
कोल्हापूर
२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
शहर विभागीय कार्यालय, कोल्हापूर — विरूध्द पक्षकार
३) उप कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, मार्केटयार्ड, जि. कोल्हापूर

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## संयुक्त न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

या दोन्ही तक्रारी एकत्रित सुनावणीसाठी घेवून एकच समायिक निर्णय करण्यात येत आहे. दोन्ही केसमध्ये समान मुद्दे असल्याने एकत्रित निकाल देवून निकालाची प्रत दुसऱ्या प्रकरणात ठेवण्यात आली आहे.

तक्रार क्र. ५९/२०१० ( नव महाराष्ट्र सूत गिरणी, साजणी, इचलकरंजी ) मधील तक्रारीचे कथन व मागणी मंचाकडे खालील प्रमाणे –

तक्रारदार एक सहकारी संस्था सूत गिरणी आहे. त्या संस्थेच्या जनरल मॅनेजरद्वारे प्रतिनिधी श्री. प्रताप ग. होगाडे यांच्यामार्फत मंचाकडे दि. ८.३.२०१० रोजी दाखल करण्यात आली. तक्रारदार संस्थेचा ग्राहक क्रमांक २५०५२९३०४४४३ व ग्राहकाचा वर्ग उच्चदाब औद्योगिक –( उप विभाग ग्रामीण इचलकरंजी, विभाग इचलकरंजी ) असा आहे. तक्रार उत्पन्न होण्याचे कारण की, सामनेवाला वितरण कंपनीने कोल्हापूर सर्कल ऑफीस यांनी तक्रारदाराचे वीज बीलामध्ये माहे ऑगस्ट २००९ मध्ये २% व सप्टेंबर २००९ मध्ये १% रक्कम जादा युनिटची आकारणी केली आहे, ती तक्रारदारास मान्य नाही. म्हणून प्रस्तुतची तक्रार सुरुवातीला अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे दि. ५.१.२०१० रोजी केली. अंतर्गत कक्षाचे आदेश दि. २२.२.२०१० रोजी पारित झाले, त्याचे नाराजीने प्रस्तुतची तक्रार ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूरकडे केली आहे. अंतर्गत कक्षाने सदरची तक्रार फेटाळली आहे.

वितरण कंपनीच्या कोल्हापूर मंडल कार्यालयाकडील पत्र दि. २१.८.२००९ नुसार २% जादा युनिटची आकारणी ही मुख्य कार्यालय, मुंबई यांचे दि. २६.९.२००९ चे पत्रानुसार केल्याचे कळविले आहे. ती आम्हांस मान्य नाही. परंतु वाढीव रकमेची बीले ' अंडर प्रोटेस्ट 'भरलेली आहेत तसे वितरण कंपनीस दि. २४.८.२००९ च्या पत्राने कळविले आहे. त्यानंतर २% ऐवजी सब स्टेशनचे मीटर रिडींगमधील फरकानुसार अंदाजे १% आकारणी सुरु केली, परंतु आकारणी रद्द केली नाही किंवा कुठलीही कार्यवाही केली नाही. दि. २६.६.२००९ चे पत्रात परिपत्रक क्र. १५ दि. १.१०.२००५ संबंधित परिपत्रकाचा हवाला देवून तक्रारदाराचे म्हणणे की, प्रत्यक्षात अशी पध्दत कुठेही प्रचलित नव्हती. सदर पत्रानंतर ऑगस्ट २००९ पासून ही पध्दत मा. आयोगाच्या मान्यतेविना लागू करण्यात आलेली आहे. तक्रारदाराचे फिडर डेडिकेटेड आहे हे लक्षांत आल्यावर सब–स्टेशनचे मीटर व ग्राहकाचे मीटर यातील फरकानुसार अंदाजे १% जादा युनिटसची आकारणी सप्टेंबरच्या बिलापासून वि.प.ने केली आहे. प्रस्तुतची आकारणी चुकीची आहे त्या पृष्ट्यर्थ तक्रारदाराचे असे म्हणणे की, मा. विद्युत नियामक आयोगाचे आदेशातील आकारणी शिवाय अन्य कोणतीही जादा आकारणी करण्याचा अधिकार वितरण कंपनीस नाही. लो व्होल्टेज लेव्हल असलेल्या ठिकाणी जादा आकरणी करावी अशा स्वरुपाचे कोणतेही आदेश मा. आयोगाने मे २००५ पासून ते आजतागायत दिले नाहीत.

तक्रारदाराचे म्हणणे की, एकूण कमाल मागणी २५०० केव्हीए आहे. सध्याची कॉन्ट्रॅक्ट डिमांड १९९६ केव्हीए आहे. मा. आयोगाचे कृति मानके विनियमातील क्र. ५.३ नुसार कॉन्ट्रॅक्ट डिमांड १५०० केव्हीएहून अधिक असेल तर विद्युत पुरवठा २२ केव्ही / ३३ केव्ही लेव्हलवरुन करण्यात आला पाहिजे अशी तरतूद आहे. या तरतुदीचा आधार घेवून तक्रारदाराचा विद्युत पुरवठा लो व्होल्टेज लेव्हलवर आहे असे म्हटले आहे ते चुकीचे आहे.

वितरण कंपनीने अशा प्रकारचा निर्णय घेतलेला आहे, तक्रारदाराची चूक नाही किंवा संमत्ती नाही. तक्रारदाराच्या दि. २८.११.२००५ च्या वीज पुरवठा मागणी अर्जास अधीक्षक अभियंता (वाणिज्य) मुंबई यांनी दि. २४.११.२००६ च्या पत्रान्वये मंजुरी दिलेली असून ११ केव्ही लेव्हलवरुन विद्युत पुरवठा करणेचा निर्णय घेतलेला आहे व त्यानुसार वि.प.च्या कोल्हापूर मंडल कार्यालयाने तसे कोटेशन देवून वि.प.ने आपल्या सोयीप्रमाणे व्होल्टेज लेव्हल निश्चित केली असल्याने त्याचा भूर्दंड तक्रारदारावर लावणेचा प्रश्नच उद्‌भवत नाही. मुख्य कायालयाचे दि. २४.११.२००६ च्या मंजुरीपत्रातसुध्दा २% जादा युनिट आकारणीची अट घातलेली नाही. वितरण कंपनी ज्या परिपत्रक क्र. १५ दि. १.१०.२००५ वर विसंबून आहे त्यामध्येसुध्दा २% आकारणी करावी अशी अट नाही. सबब ऑगस्ट २००९ पासून पुढे ‘ अंडर प्रोटेस्ट ‘भरलेली सर्व रक्कम अतिरिक्त घेतलेली असलेने वीज कायदा २००३ मधील अधिनियम ६२ (६) अन्वये व्याजासह परत मिळावी अशी विनंती केली आहे. तसेच अशा प्रकारची आकारणी बेकायदेशीर म्हणून घोषित करावी अशी मागणी केली आहे.

अंतर्गत कक्ष, कोल्हापूर याच्या निर्णयासंबंधी केस क्र. ८४/२००६ चा दाखल दिला आहे. सदर आदेशानुसार महावितरणने एस.ओ.पी. मध्ये आवश्यक तो बदल वा दुरुस्ती मागणे आवश्यक आहे. तशी मागणी आजपर्यंत केलेली नाही. परंतु केस क्र. ७१/२००९ ची सुनावणी मा. आयोगासमोर झालेली आहे तथापि आयोगाने कोणताही निर्णय दिलेला नाही. परंतु वितरण कंपनीने २% जादा आकारणी चालू ठेवण्यास मान्यता द्यावी अशी मागणी केलेली आहे. यावरील सुनावणी ५ मार्च २०१० मा. आयोगाने नेमून पुढे अशी आकारणी करण्यास परवानगी दिली आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, अशी आकारणी मा. आयोगाच्या मान्यतेशिवाय सुरु करण्यात आली आहे. अंतर्गत कक्षाच्या निकालामधील संदर्भानुसार ही मागणी वितरण गळतीपोटी असल्याचे म्हणणे बरोबर नाही, कारण ही गळती टॅरीफ ऑर्डरमध्ये हिशेबात आलेली आहे. या गळतीपोटी वेगळी आकारणी करणे याचा अर्थ ग्राहकाकडून दुहेरी वसुली करणे व मा. आयोगाच्या मान्यतेशिवाय परस्पर टॅरीफ रिव्हीजन (टॅरिफमध्ये वाढ करणे) असा होतो, असे करण्याचा अधिकार महावितरण कंपनीस नाही. त्यामुळे कक्षाचे या आकारणीला योग्य म्हणणे हे मा. आयोगाच्या अधिकारांचा अधिक्षेप करणारे आहे असे तक्रारदाराचे म्हणणे आहे. तक्रारदाराचे आणखी एक म्हणणे की, वि.प.चे कृती मानके (एस.ओ.पी.) विनियम २००५ मध्ये सुधारणा करण्यासाठी प्रारुप (ड्राफ्ट अमेंडमेंटस्) दि. १४.११.२००८ चा जाहीर नोटीसद्वारे वर्तमानपत्रात जाहीर करुन सूचना व हरकती मागविलेल्या आहेत. त्यानुसार प्रारुप सुधारणानुसार ११ केव्ही लाईनवर ३००० केव्हीए पर्यंत, २२ केव्ही लाईनवर १०००० केव्हीएपर्यंत व ३३ केव्ही लाईनवर २०००० केव्हीए पर्यंत मागणीस मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा.आयोगासमोर विचाराधीन आहे. त्यामुळे एखाद्या ग्राहकास कमी दाबावरुन वीज पुरवठा केला आहे किंवा नाही हे आज ठरविताच येणार नाही.

वरील सर्व कारणांवरुन तक्रार मंजूर करण्यात यावी. ऑगस्ट २००९ पासून २% व नंतर १% जादा युनिटची करण्यात आलेल्या आकारणीचा परतावा मिळावा.

नोडल ऑफीसर, कोल्हापूर यांनी आपल्या दि. २९.३.२०१० च्या लेखी अहवालात मा. आयोगाच्या ५ मार्च २०१० च्या केस क्र. ७१/२००९ वर प्रामुख्याने भर दिला आहे.

MERC approved to levy extra surcharge to such consumers who avails supply at the voltage less than the prescribed voltage in SOP, from the issue of this Order. So the levy of extra units (The difference in the sub station meter reading and consumer meter reading is levied) will be continued as per this Order and the matter of the refund of previous amount which was levied is referred to the Corporate Office for further guidance.

तसेच २% जादा युनिटसची मागणी (लेव्ही) ही मुख्य अभियंता (वाणिज्य) यांचे परिपत्रक क्र. २१९६० दि. २६.६.२००९ नुसार आहे. त्याचा संदर्भ कोऑर्ड. सेल/सँक्शन लोड/१४७७ दि. १४.११.२०१० यामध्ये जादा युनिटसची मागणी केली नाही अशा संबंधित अधिकाऱ्यास लॉस ऑफ रेव्ह्यन्यूसाठी जबाबदार धरण्यात येईल. मा. विद्युत नियामक आयोगाचा केस क्र. ८४/२००६ मधील आदेशाचा संदर्भ देवून वितरण कंपनीने केस क्र. ७१/२००९ मध्ये १५% आकारणीस परवानगी मिळावी अशी मागणी केली आहे आणि इंटेरिम रिलीफच्या स्वरुपात मिळावा यासाठी विनंती केली की,

To continue levy of 2% of monthly consumption of eneregy consumed by the consumer in terms of the extra units the consumers whom the energy supplied lower than the prescribed voltage, till the approval of 15% voltage surcharge

तसेच आपल्या पत्रात पॅरेग्राफ ३ मध्ये अशा प्रकारची जादा युनिटची मागणी (लेव्ही) ही लॉस फॅक्टर विचारांत घेवून मुख्य अभियंता (वाणिज्य) मुंबई यांचे मंजुरी पत्रातील क्लॉज ६ नुसार केलेली आहे व ती अतिरिक्त भारसाठी असल्याने त्याची मागणी ग्राहकाचे युनिटसवर केलेली आहे.

<u>तक्रार क्र. ६०/२०१० (मे. घाटगे पाटील इंडस्ट्रीज लि.)</u>

तक्रारदार मे. घाटगे पाटील इंडस्ट्रीज लि.चे व्हाईस प्रेसिडेंट फायनान्स, श्री. जे.एच. कुलकर्णी यांनी प्रस्तुतची तक्रार दि. ८.३.२०१० रोजी प्रतिनिधी श्री. होगाडे यांचेमार्फत दाखल केली आहे. तक्रारदाराचा ग्राहक क्र. २६६५४९१०००४० असून ग्राहकाचा वर्ग उच्चदाब औंद्योगिक –(उप विभाग मार्केटयार्ड, विभाग शहर कोल्हापूर, कोल्हापूर सर्कल ऑफीस ) असा आहे. तक्रारदार यांनी आपल्या अ फॉर्ममधील मंचामध्ये तक्रारीसोबत दिलेल्या तपशिलानुसार या तक्रारदारास २% जादा युनिटची आकारणी ऑगस्ट २००९ पासून करण्यात आलेली आहे व ती त्यांस मान्य नसल्याने प्रतिनिधीमार्फत तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार याने सदरची जादा आकारणी मान्य नाही असे दि. २८.८.२००९ च्या पत्राने वितरण कंपनीस कळविले आहे व ' अंडर प्रोटेस्ट ' वाढीव रकमेसह बील भरले आहे. त्यानंतर दि. ६.९.२००९ रोजी व दि. ४.१०.२००९ रोजी पुन्हा ही आकारणी अमान्य असल्याचे कळविले आहे. तथापि मंडल कार्यालयाने प्रथम दिनांक २३.९.२००९ रोजी आकारणी योग्य असल्याचे कळविले आहे व त्यानंतर दि. २२.१०.२००९ रोजी सदरची बाब धोरणात्मक असल्याने मुख्य कार्यालयाकडे विचारणा केली आहे असे कळविले आहे.

तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे क्ष फॉर्ममध्ये दि. ३१.१२.२००९ रोजी तक्रार दाखल केली. परंतु कक्षाने तक्रार फेटाळल्याने प्रस्तुतची तक्रार मंचासमोर करण्यात आली आहे. या तक्रारीतील सर्व मुद्दे केस क्र. ५९/२०१० नव महाराष्ट्र सूत गिरणी, साजणी, इचलकरंजी या केसमध्ये उपस्थित केलेल्या मुद्द्याप्रमाणे व सर्व कारण (ग्राऊंडस) या केसप्रमाणेच उपस्थित केले आहे. प्रस्तुत तक्रारीत ऑगस्ट २००९ पासून २% जादा युनिटस आकारणी बिलातून करण्यात आलेली आहे ती बेकायदेशीर असून ती रद्द करावी अशी विनंती केली आहे. सदरची रक्कम व्याजासह परत मिळावी अथवा पुढील बिलात समायोजित करावी. आपल्या म्हणणे पृष्ट्यर्थ बिलाच्या प्रती व सँक्शन ऑर्डर जोडली आहे.

कार्यकारी अभियंता / नोडल ऑफीसर, कोल्हापूर मंडल यांनी दि. २९.४.२००९ च्या पत्रानुसार वितरण कंपनीची कारवाई योग्य असल्याचे कथन केले आहे. त्या पृष्ट्यर्थ केस क्र. ५९/२०१० मध्ये उपस्थित केलेले सर्व मुद्दे या केसमध्ये उल्लेखिलेले आहेत.

सदरच्या दोन्ही तक्रारींची एकत्रित सुनावणी मंचासमोर दि. १९.४.२०१० रोजी घेण्यात आली. तक्रारदार प्रतिनिधी श्री. प्रताप होगाडे उपस्थित. वि.प.तर्फे श्री. आडके, नोडल ऑफिसर, श्री. आहुजा, सहाय्यक अभियंता उपस्थित. श्री. होगाडे, तक्रारदार प्रतिनिधी यांनी वितरण कंपनीने दि. १.८.२००९ ते ५.३.२०१० या काळात २% युनिटवरती आकारणी केलेली रक्कम परत करावी, कारण अशा प्रकारे २% मागणी (चार्ज) करु नये असा वि.प.कडे दि. १५.३.२०१० रोजी अर्ज दिला होता परंतु कोणतीही कार्यवाही केलेली नाही असे म्हणणे मांडले. तक्रारीतील मागणी पृष्टयर्थ श्री. होगाडे यांनी वि.प.ची दि. २६.६.२००९ चे पत्र ज्यानुसार अशा प्रकारची मागणी केली आहेत ती मा. विद्युत नियामक आयोगाच्या मान्यतेशिवाय आहे व त्यास कायदेशीर आधार नाही. वितरण कंपनीने मा. आयोगाकडे केस क्र. ७०/२००९ मध्ये २% जादा युनिट आकारणीस परवानगी द्यावी अशी विनंती केली आहे याचाच अर्थ मा. आयोगाच्या मान्यतेशिवाय ही आकारणी करण्यात आली हे स्पष्ट होते. लो व्होल्टेज लेव्हल बाबत जादा दराने मागणी करण्याचे मे २००९ पर्यंत अशी परवानगी दिलेली नाही, त्यामुळे वसूल केलेली रक्कम बेकायदेशीर असून ती परत करावी त्यावर विद्युत कायदा २००३ कलम ६२.६ नुसार व्याजही मिळावे. परिपत्रक क्र. १५ दि. १.१०.२००५ चे आहे त्यामध्ये अशा प्रकारची अट नाही. तसेच अंतर्गत कक्षाच्या आदेशाचे निरीक्षण केले असता अशाप्रकारची आकारणी व मागणी तांत्रिकदृष्ट्या व्हायेबल आणि त्यामुळे तो दूर्लक्ष करुन चालणार नाही हे कायदेशीर नाही. श्री. होगाडे यांनी प्रामुख्याने मा. आयोगाचे पूर्वलक्षी (रेट्रॉस्पेक्टीव्ह) प्रभावाने असे आदेश नसतात, यासाठी वि.प.चे एस.ओ.पी. मधील मागणीपोटी ड्राफ्ट अमेंडमेंटला अद्याप मा. आयोगाने मान्यता दिलेली नाही, त्यामुळे अशी मागणी बेकायदेशीर आहे. कारण जो पर्यंत अशी दुरुस्त एस.ओ.पी. च्या मागणीबद्दल निर्णय होत नाही, तो पर्यंत दि. ५.३२००५ पासून पुढे २% जादा युनिटची मागणी लागू होत नाही. श्री. आहुजा, सहाय्यक अभियंता यांनी तक्रारदाराचा दि. १५.३.२०१० चा अर्ज मुख्य अभियंता ऐवजी मुख्य कार्यालयाकडे पाठविला आहे कारण ती धोरणात्मक बाब आहे आणि केलेली आकारणी ही वाणिज्य परिपत्रक क्र. १५ दि. १.१०.२००५ व त्यानंतरचे मुख्य अभियंता (वाणिज्य) मुंबई यांच्या दि. २६.६.२००९ च्या पत्रानुसार केलेली आहे व ती योग्य आहे असे सांगितले. तसेच प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दाखल करुन घेवू नये व मान्य करु नये कारण त्यांचे म्हणण्यानुसार विद्युत कायदा २००३ नियम ६.७ क्लॉज डी नुसार तक्रारीतील मागणी मा. ट्रिब्यूनल कोर्ट, दिल्ली येथे व केस क्र. ७१/२००९ मा. आयोगासमोर प्रलंबित आहे. त्यामुळे नियम ६.७ क्लॉज डी नुसार अशी तक्रार चालू शकत नाही किंवा करता येवू शकत नाही म्हणून ती फेटाळण्यात यावी. ग्राहक प्रतिनिधी श्री. होगाडे यांनी कायद्याच्या मुद्दयाच उत्तर देतांना परिपत्रक क्र. १५ दि. १.१०.२००५ हे बंधनकारक नाही आणि मा. आयोगाच्या आदेशा विरुध्द आहे व कायद्याच्या विरुध्द असलेचे सांगितले. तसेच अंतर्गत कक्ष येथे अशा प्रकरणी हरकत ६.७ खाली घेतली नाही व केस प्रलंबित असल्याची माहिती दिली नाही.

वरील विवेचनानुसार खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होत आहेत.

१) तक्रारदार तक्रारीत मागितल्याप्रमाणे वसूल केलेली रक्कम व्याजासह वि.प.कडून मिळणेस हक्कदार आहे काय ?

उत्तर : होय

२) प्रस्तुतची तक्रार नियम ६.७ डी मधील तरतुदीनुसार दाखल करुन घेता येईल काय ?

उत्तर : होय

३) आदेश ?

उत्तर : खालील प्रमाणे

<u>कारणमिमांसा</u>

प्रस्तुतच्या दोन्ही तक्रारीतील फॅक्चुअल आस्पेक्ट दोन्ही बाजूंना मान्य असल्याचे त्यांच्या लेखी / तोंडी कथनावरुन स्पष्ट होते. तरी परंतु हे उभयबाजूस मान्य आहे की, प्रथमत: ऑगस्ट २००९ पासून वीज बिलात सुरुवातीस २% व सप्टेंबर पासून १% जादा युनिटची आकारणी करण्यात आली आहे. तक्रारदाराने त्वरीत केस क्र. ५९ मध्ये दि. २४.८.२००९ रोजी पत्राने कळविले व केस क्र. ६० मध्ये दि २८.८.२००९ च्या पत्राने कळविले. त्यानुसार प्रस्तुतची रक्कम अंडर प्रोटेस्ट वाढीव रकमेसह भरलेली आहे. तक्रार क्र. ६० मे. घाटगे पाटील इंडस्ट्रिज लि. यांनी दि. ६.९.२००९ व दि. ४.१०.२००९ च्या पत्रानुसार अशाप्रकारणी आकारणी अमान्य असल्याचे कळविले. त्यानंतर वितरण कंपनीने अशी आकारणी योग्य असल्याचे दि. २३.९.२००९ च्या पत्राने कळविले. त्यानंतर सदरची बाब धोरणात्मक असलेने मुख्य कार्यालय, मुंबईकडे विचारणा केली असल्याचे कळविले. प्रथमत: येथे नमूद करावेसे वाटते की, वितरण कंपनी परिपत्रक क्र. १५ दि. १.१०.२००५ वर भर देत आहे. केस क्र. ५९ नव महाराष्ट्र सूत गिरणी मधील तक्रारीमध्ये तक्रारदाराची वीज मंजुरी दि. २४.११.२००६ नुसार आहे व क्र. ६० मे. घाटगे पाटील इंडस्ट्रीजमध्ये विद्युत पुरवठा दि. १.६.२००९ पासून डी.डी.एफ. स्कीम अंतर्गत आहे व याच फिडरवरुन मे. आदिटेक या त्यांच्या सिस्टर कंसर्नला दि. २०.७.२००९ पासून वीज पुरवठा आहे. केस क्र. ६०/२०१० मध्ये वि.प.ने दि. २०.७.२००९ ला सदर ३३ केव्ही फिडरवर सदर ग्राहक असलेने फिडर नॉन डेडिकेटेड आहे असे गृहीत धरले व तेव्हापासून २- जादा युनिट आकारणी केली. या बाबत वि.प.ने आपल्या लेखी अहवालात अथवा तोंडी खुलासा मंचासमोर केला नाही, त्यामुळे तक्रारदाराचे म्हणणे ग्राह्य वाटते.

प्रथमत: तक्रारदार अशा मागणीस हक्कदार e(ntitle to ) आहे का ?

श्री. होगाडे यांनी प्रतिपादन केल्याप्रमाणे मा. विद्युत नियामक आयोग यांनी दिलेल्या आदेशानुसार वीज दर वि.प. घेवू शकते. त्या आदेशा व्यतिरिक्त अन्य कोणतीही जादा आकारणी करण्याचा वि.प.स हक्क नाही. त्यामुळे लो व्हाल्टेज लेव्हल असलेल्या ठिकाणी जादा आकारणी करण्याबाबतचे आदेश आयोगाने मे २००५ पासून ते आजतागायत दिलेले नाहीत. या बाबत वि.प. कांही स्पष्टीकरण देवू शकत नाही आणि त्यामुळे श्री. होगाडे यांनी सदरची मागणी व आकारणी बेकायदेशीर आहे असे म्हणणे मांडले आहे. या ठिकाणी वि.प.तर्फे मा. विद्युत नियामक आयोगाकडील केस क्र. ७१/२००९ दि. ५.३.२०१० च्या आदेशा बाबत चर्चा करणे योग्य होईल. तक्रारदार यांनी प्रस्तुतच्या निकालाची प्रत मंचासमोर हजर केली.

It is further prayed that the Hon'ble Commission may be pleased to grant by way of Interim Relief, to continue levy of 2% of monthly consumption of energy consumed by the consumer in terms of extra units to the consumers whom the energy is supplied at lower voltage than prescribed voltage till the approval of 15% voltage surcharge.

मा. आयोगाने आपला आदेश केस क्र. ७१/२००९ दि. ५.३.२०१० पॅरेग्राफ १७ पान क्र. १२ वर म्हटले आहे की,

The Commission approves MSEDCL's request for interim relief seeking permission to levy voltage surcharge of 2% additional units to be billed for supply to the consumers at voltages lower than that specified in the SOP Regulation. It is clarified that this voltage surcharge shall apply from the date of issue of this order, till such time as the Commission issues further Orders.

यावरुन श्री. होगाडे यांनी म्हटल्याप्रमाणे मा. आयोगाचे आदेश हे पूर्वलक्षी प्रभावाने नसतात हे मान्य करावे लागेल. वि.प.तर्फे ऑगस्ट २००५ पासून करण्यात आलेली २% जादा युनिट आकारणी कायदेशीर होवू शकत नाही असेच म्हणावे लागेल. त्यामुळे पत्र क्र. २१९६० दि. २६.६.२००९ नुसार केलेली मागणी ही कायद्यास धरुन नाही किंवा एस.ओ.पी. तरतुदीनुसार नाही असे म्हणावे लागेल. या निर्णयास श्री. होगाडे यांनी केस क्र. ११५/२००९ दि. ३१.३.२०१० च्या मा. आयोगाच्या आदेशामधील पॅरेग्राफ ६ मध्ये म्हटल्यानुसार व जे असे की

MSEDCL is authorised to charge only that tariff, which is determined and approved by the Commission in accordance with the provisions under Part VII (Tariff) of the Electricity Act 2003. ("EA 2003")

मा. आयोगाच्या आदेशानुसार पब्लीक नोटीस दि. ११.४.२०१० रोजी त्याच केसमध्ये प्रसिध्द केली आहे. Page 10, Clause 5(i) – Levy of 2% surcharge in case of power supply on voltage level below prescribed voltage level. ही बाब टॅरिफ प्रपोसलमध्ये अंतभूत आहे. त्यावरुनही यापूर्वी मा.आयोगाने वितरण कंपनीस अशा प्रकारे २% सर–चार्ज लो व्होल्टेज लेव्हल या सबबीखाली वसूल करण्याचा अधिकार दिलेले नाहीत.

तक्रार क्र. ५९ – नव महाराष्ट्र सूत गिरणी, साजणी या तक्रारदाराच्या कथनानुसार एकूण मंजूर कमाल भार २५ केव्हीए व सी.डी. १९९६ केव्हीए आहे. कृती मानकातील तरतुद क्र ५.३ नुसार सीडी १५०० केव्हीएहून अधिक असेल तर विद्युत पुरवठा २२ केव्हीए/ ३३ केव्हीए लेव्हलकरुन करता आला पाहिजे अशी तरतूद आहे. वितरण कंपनीने विद्युत पुरवठा लो व्होल्टेज लेव्हलवरुन आहे असे म्हणून आकारणी केली आहे त्यांस ग्राहकाची संमत्ती नाही आणि वि.प.ने मंजुरीच्या पत्रामध्ये अशा प्रकारची कुठलेही अट घालण्यात आलेली नाही. तसेच परिपत्रक क्र. १५ दि. १.१०.२००५ यामध्येसुध्दा २% जादा युनिट आकारणी करता येईल अशी अट नाही. मुख्य कार्यालयाचे पत्र क्र. २१९६० दि. २६.६.२००९ मध्ये स्पष्ट आदेश आहेत की ग्राहकाची लेखी मान्यता घेतल्यानंतर विद्युत पुरवठा जोडणे. तक्रारदाराने अशी लेखी मान्यता दिली नाही किंवा वि.प.ने घेतली नाही असे प्रतिपादन केले आहे. परंतु त्याबाबत वि.प.ने कुठल्याही प्रकारचा खुलासा केला नाही, त्यामुळे अशी मान्यता घेतल नव्हती हे ग्राह्य धरता येईल.

अंतर्गत कक्षाने मा. आयोगाकडील केस क्र. ८४/२००६ च्या आदेशाचा संदर्भ दिला आहे, त्यामध्ये वि.प. एस.ओ.पी. विनियमात दुरुस्ती करु शकते किंवा बदल मागू शकते, परंतु असा बदल मागितलेला नाही व केस क्र. ७१/२००९ मध्ये अद्याप निर्णय झालेला नाही. तसेच केस क्र. ७१/२००९ मध्ये नॉन डेडिकेटेस व्होल्टेजवरुन २% जादा मागणी व डेडिकेटेड फिडरवर पुरवठ्याच्या ठिकाणी व वापराचे बील ज्या ठिकाणी मिटरवर जादा वापर आहे तो गृहीत धरावा अशी मागणी केली आहे, त्याबाबत मा. आयोगाने कोणत्याही प्रकारचे आदेश दिलेले नाहीत. यावरुनच वादग्रस्त ऑगस्ट २००९ पासून तक्रारदारास वि.प.ने केलेली आकारणी ही विना मान्यता/ परवाना आहे असे स्पष्ट होते. तसेच तक्रारदारास विद्युत पुरवठा मंजुरी पत्रातील अट क्र. १ : Consumer will be liable to pay additional charge whatever determined by MERC for the supply on lower voltage level as per SOP. मा. विद्युत नियामक आयोगाने असा सर–चार्ज अद्याप लावलेला नाही, त्यामुळे तक्रारदाराची तक्रार मान्य करण्याशिवाय पर्याय नाही.

अंतर्गत कक्षाच्या आदेशामधील निरीक्षण पत्र क्र. २१९६० दि. २६.६.२००९ नुसार आकारणी केल्याचा उल्लेख आहे, परंतु असे पत्र मा. आयोगाचे आदेशाविना व मान्यतेविना आहे हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे, हे सिध्द झालेले आहे, त्यामुळे ते बेकायदेशीर ठरते.

श्री. आडके व श्री. आहुजा यांनी तक्रारदाराचा त्यांना मिळालेला अर्ज मुख्य कार्यालयाकडे पाठविल्याचे म्हटले आहे. कदाचित मुख्य कार्यालयाचे मार्गदर्शन घेण्यासाठी पाठविला असेल, परंतु त्याचवेळी प्रचलित एच.ओ.पी. प्रमाणे लो व्होल्टेज लेव्हल यास मा. आयोगाची मान्यता आहे किंवा नाही याची छाननी / तपासणी ते करु शकले असते, ती केली नाही. परिपत्रक क्र. १५ दि. १.१०.२००५ हे विचारात घेता, त्यातील शेवटचा पॅरेग्राफमध्ये लो व्होल्टेज लेव्हल बाबत २% जादा युनिट आकारणी करण्याबद्दलच्या अटीचा उल्लेख नाही. यावरुन मा. आयोगाचे आदेशाशिवाय वितरण कंपनी ग्राहकाकडून कसल्याही प्रकारचे लो व्होल्टेज लेव्हल वरुन विद्युत पुरवठ्याबाबत जादा आकारणी घेवू शकत नाही हे स्पष्ट होते.

वरील विवेचनावरुन हे स्पष्ट होते की, वितरण कंपनीने ऑगस्ट २००९ पासून दोन्ही तक्रारीमध्ये सुरुवातीस २% व नंतर १% जादा युनिटची आकारणी करुन मागणी केलेली व वसूल केलेली रक्कम परत मिळणचो तक्रारदारास हक्क आहे. तक्रारदाराकडून केलेली वसुली ही कुठल्याही प्रकारचे मा. आयोगाच्या आदेशाच्या आधारावर केलेली नसून ती बेकारदेशीर आहे. म्हणून मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे आहे. श्री,. आडके, नोडल ऑफिसर व श्री. आहुजा, सहाय्यक अभियंता यांनी वि.प.तर्फे मा. विद्युत नियामक आयोगाकडे केस क्र. ७१/२००९ मध्ये हा मुद्दा विचाराधीन आहे तो फायनल झाला नाही त्यामुळे प्रस्तुतची तक्रार ६.७ खाली चालविणेस पात्र नाही असे प्रतिपादन केले. त्यावर ग्राहक प्रतिनिधी श्री. होगाडे यांनी अशा प्रकारचे ऑबजेक्शन अंतर्गत कक्षामध्ये घेतले आहे, परंतु या ठिकाणी स्पष्ट करावेसे वाटते की, कायद्याचा मुद्दा म्हणजेच Bar of jurisdiction or tenability of complaint मध्ये तक्रार ही कुठल्याही स्टेजला घेता येईल. नियम ६.७ क्लॉज डी – जेथे कोणतेही न्यायालय, प्राधिकरण, लवाद अथवा अन्य कोणतेही प्राधिकरण यांचेपुढे त्याच गाऱ्हाण्याच्या संदर्भात ग्राहकाचे अभिवेदन प्रलंबित आहे किंवा अशा कोणत्याही न्यायालय, प्राधिकरण, लवाद अथवा अन्य कोणतेही प्राधिकरण यांनी यापूर्वीच डिक्री किंवा निवाडा किंवा अंतिम आदेश दिलेला आहे.

Its English Version reads 6.7 Clause D

Where a representation by a consumer in respect of the same grievance is pending before any Court, Tribunal or Arbitrator or any other authorities or a decree or award or a final order has already been passed by such Court, Arbitrator or authorities, in such case Forum usually not entertains grievance.

यावरुन हे स्पष्ट होते की, तक्रारदारातर्फे त्याच गाऱ्हाण्याच्या बाबतीत इतर कुठल्याही न्यायालयात, प्राधिकरण, लवाद व इतर ॲथॉरिटीकडे प्रलंबित असेल किंवा अशा संदर्भात कांही आदेश झाले असतील तर अशी गाऱ्हाणी मंचापुढे चालणार नाहीत.

प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये वि.प.चे म्हणणे की, केस क्र. ७१/२००९ बाबत सुनावणी प्रलंबित आहे. परंतु तक्रार चालू शकत नाही हे मत बनविण्यासाठी त्याच तक्रारदाराचे त्याच गाऱ्हाण्याबद्दल इतरत्र कारवाई प्रलंबित असेल तर बाधा येईल.

केस क्र. ७१/२००९ मध्ये मा. आयोगापुढे वि.प.ने नॉन डेडिकेटेड फिडरवर २% जादा युनिटची मागणी व एक्स्प्रेस डेडिकेटेड फिडरवर पुरवठ्याच्या ठिकाणी किंवा वापराचे ठिकाणी ज्या ठिकाणी जादा वापर मिटरवर असेल तो गृहीत धरण्यास परवानगी द्यावी ही मागणी अंतरिम आदेशासाठी आयोगापुढे केली आहे, त्या बाबत आदेश नाहीत. त्यामुळे या दोन्ही केसमधील तक्रारदाराचे गाऱ्हाणे (same grievance) प्रलंबित आहे असे म्हणता येणार नाही. कारण तक्रारदाराची त्याच गाऱ्हाण्यासंबंधी इतरत्र केस प्रलंबित असणे ही मुख्य अट आहे. या केसमध्ये वि.प.ने ग्राहकाची इतरत्र त्याच गाऱ्हाण्याबद्दल कारवाई (Representation) प्रलंबित आहे असे दाखवू शकला नाही. मुद्दा क्र. २ चे उत्तर नाही असे द्यावे लागेल.

मुद्दा क्र. १ मधील उप प्रश्न – तक्रारदार यांनी व्याज मिळणेबद्दलची विनंती मान्य करणे योग्य वाटते. याबाबत श्री. होगाडे यांनी सेक्शन ६२ व सब सेक्शन ६ विद्युत कायदा २००३ नुसार असे व्याज देता येईल असे सांगितले.

If any Licensee or Generating Co. recovers a price or charge exceeding the tariff determined under Section, excess amount shall be recoverable by person who has paid such price or charge along with interest equivalent to the bank rate without prejudice to any supply liability incorporated by the Licensee.

यावरुन हे स्पष्ट होते की, मा. विद्युत नियामक आयोगाचे टेरिफ निश्चितीबाबतचे आदेश, लो व्होल्टेज लेव्हल यायबाबत कुठलीही मान्यता किंवा संमत्ती नाही, त्यामुळे २% अथवा १% जादा युनिट आकारणी बिलातून करुन जी अशी जादा रक्कम ग्राहकाकडून बिलातून वसूल केली आहे, त्याला ती परत मिळण्याचा अधिकार प्राप्त होतो व तशी रक्कम व्याजासह बँक रेट प्रमाणे द्यावे. व्याजाबद्दल बँक रेट दोन्ही बाजूनी रेकॉर्डवर आणला नाही, परंतु श्री. होगाडे, ग्राहक प्रतिनिधी यांनी ग्राहकास पाठविलेल्या बिलात सुरुवातीस १२%, १६% व १८% व्याज आकारले जाते. बँकेचे कर्जाचे व्याज दर १२% आहेत याची (ज्युडिशियल नोट) नोंद घेवून त्याच दराने व्याज परतावा, मिळणाऱ्या रकमेवर ग्राहकास मिळणेचा हक्क आहे व वि.प.ने परताव्याची रक्कम देतांना त्यावर १२% दराने व्याज द्यावे असे आदेश देणे संयुक्तिक होईल.

तसेच मा. विद्युत नियामक आयोगाने १ मे २००७ रोजी लागू केलेल्या टेरिफ ऑर्डर हाय टेन्शन टेरिफ बुकलेट मधील अंतर्गत पान क्र. २२६ वर व्याजाचे दर १२% जर पेमेंट ड्यू डेट नंतर ३ महिन्यानंतर होत असेल तर व्याज लावावे असे आदेश दिले आहेत. त्यामुळे १२% व्याज देण्याच्या मंचाच्या निर्णयास पुष्टी मिळते.

वरील मुद्द्यांचे निर्णयाबाबत तक्रार चालू शकते व तक्रारदार यांना दोन्ही प्रकरणात त्यांचेकडून ऑगस्ट २००९ पासून बिलात सुरुवातीस २% व नंतर १% युनिटची आकारणी बेकायदेशीर आहे. वितरण कंपनी मा. आयोगाचे आदेशा शिवाय २% व १% लो व्होल्टेज लेव्हल बाबत जादा युनिट आकारणी करता येणार नाही, त्यामुळे दोन्ही तक्रारी मंजूर करण्यात येत आहे.

सदर तक्रारी दि. ८.३.२०१० रोजी मंचासमोर दाखल करण्यात आल्या. वितरण कंपनीस नोटीस देवून त्यांनी आपले म्हणणे दि. २९.३.२००९ ला दिले. त्यानंतर सांगली भागातील चलनाच्या अनेक प्रकरणांची सुनावणी झाली व निर्णयासाठी प्रलंबित असल्याने व सोलापूरची कांही २००९ ची प्रकरणे प्रलंबित असल्याने सदर प्रकरणांचा निकाल दोन महिन्याच्या कालावधीत करता आला नाही.

## आदेश

१) तक्रार क्र.५९/२०१० मंजूर करण्यात येत आहे. तक्रार क्र. ६०/२०१० मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण परवानेधारक म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित, ग्रामीण उप विभाग, इचलकरंजी (कोल्हापूर मंडल) यांनी तक्रारदार नवमहाराष्ट्र सूत गिरणी यांना त्यांचेकडून ऑगस्ट २००९ ते ५.१.२०१० या काळातील २% व १% जादा युनिटस आकारणीपोटी वसूल केलेली रक्कम १२% व्याजाने तक्रारदार यांस द्यावी. या रकमेचे समायोजन तक्रारदार ग्राहकाचे पुढील बिलातून करण्यात यावे.

३) तक्रार क्र. ६०/२०१० – मे. घाटगे पाटील इंडस्ट्रीज लि. यांना वितरण परवानेधारक, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित, मार्केटयार्ड उप विभाग (कोल्हापूर मंडल) यांनी तक्रारदार यांस ऑगस्ट २००९ चे बिलातून २% जादा युनिटच्या आकारणीपोटी वसूल केलेली सर्व रक्कम १२% व्याजाने परत द्यावी. या रकमेचे समायोजन तक्रारदार ग्राहकाचे पुढील बिलातून करण्यात यावे.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक :

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :